पुढारी

# विद्यापीठात आजपासून कार्यशाळेचे आयोजन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागात दि. १५ व १६ मे रोजी सकाळी ११ ते संध्याकाळी ५ पर्यंत 'नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी ओपन डे' कार्यशाळेचे आयोजन केले आहे. कार्यशाळा बारावी विज्ञान शाखेचे विद्यार्थी व त्यांच्या पालकांसाठी आहे. यात तज्ज्ञ प्राध्यापकांसोबत चर्चासत्रे, नॅनो तंत्रज्ञानातील नावीन्यपूर्ण संशोधनाची प्रात्यक्षिके, सुसज्ज प्रयोगशाळांच्या भेटी यांचा अंतर्भाव आहे. कार्यशाळेत उपस्थितांना प्रायोगिक संशोधन कार्याची प्रात्यक्षिके पाहावयास मिळणार आहेत. अशी माहिती अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. किरणकुमार शर्मा यांनी दिली आहे.

15 MAY 2022 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रेशीम उत्पादनास प्रोत्साहनासाठी प्रयत्नशील

## पालकमंत्री सतेज पाटील, शिवाजी विद्यापीठाच्या रेशीम शेती फिरत्या प्रयोगशाळेचे लोकार्पण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

रेशीम उत्पादन व उद्योग क्षेत्रात जिल्ह्याला पुढे घेऊन जाण्यासाठी नजीकच्या काळात पद्धतशीर प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री सतेज पाटील यांनी दिली. शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभागाने जिल्हा नियोजन मंडळाच्या सहकार्यातून उभारलेल्या 'रेशीम शेती फिरत्या प्रयोगशाळे'चे लोकार्पण त्यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मश्री डॉ. जी. डी. यादव,



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या रेशीम शेती फिरत्या प्रयोगशाळेच्या लोकार्पणप्रसंगी नामफलकाचे अनावरण करताना पालकमंत्री सतेज पाटील. सोबत मान्यवर.

जिल्हा नियोजन अधिकारी विजय पवार प्रमुख उपस्थित होते.

यावेळी काही रेशीम उत्पादक शेतकरी आणि उद्योजकांनी यशकथा सांगितल्या. रेशीमशास्त्रज्ञ डॉ. अधिकराव जाधव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. माधुरी वाळवेकर यांनी सूत्रसंचालन केले.

तत्पूर्वी, मंत्री सतेज पाटील यांच्या हस्ते रेशीम शेती फिरत्या प्रयोगशाळेचे नामफलक अनावरण आणि फीत कापून लोकार्पण करण्यात आले.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, जी. आर. पळसे, डॉ. आर. के. कामत, डॉ. एस. एस. महाजन, डॉ. संजय जाधव, डॉ. ए. ए. देशमुख, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. एम. एस. देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

### वन्यरेशमापासून निर्मित शाल प्रदान

या कार्यक्रमात पालकमंत्री सतेज पाटील आणि जिल्हा नियोजन अधिकारी विजय पवार यांना वन्यरेशमापासून निर्मित शाल आणि प्रियांका जाधव यांनी रेशीमकोशांपासून बनविलेले विशेष हार प्रदान करून गौरविण्यात आले. मान्यवरांना तुतीची रोपे, फळे आणि तुतीपासून निर्मित चहापूडही देण्यात आली.

15 MAY 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रेशीम उत्पादन पुढे नेण्यासाठी प्रयत्न

## सतेज पाटील; विद्यापीठात फिरत्या रेशीम शेती प्रयोगशाळेचे लोकार्पण

**कोल्हापूर, ता. १४ :** रेशीम उत्पादन व उद्योग क्षेत्रात जिल्ह्याला पुढे घेऊन जाण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही पालकमंत्री सतेज पाटील यांनी आज दिली. शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभागाने जिल्हा नियोजन मंडळाच्या सहकार्यातून उभारलेल्या 'रेशीम शेती फिरत्या प्रयोगशाळे'च्या लोकार्पण सोहळ्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, शास्त्रज्ञ पद्मश्री डॉ. जी. डी. यादव, जिल्हा नियोजन अधिकारी विजय पवार उपस्थित होते.

श्री. पाटील म्हणाले, 'शेतीच्या बांधापासून रेशीम निर्मितीपर्यंत असा एक अनोखा आणि महत्त्वपूर्ण उपक्रम विद्यापीठाने हाती घेतला. त्यासाठी शेतकऱ्यांची मानसिकता आणि प्रशिक्षण अशा दोन्ही अंगाने विकास करण्यासाठी खास शेतकऱ्यांसाठी पदविका अभ्यासक्रम आखून त्याअंतर्गत सातत्याने मार्गदर्शन केले. त्यातून चांगली फलनिष्पत्ती दिसून आल्यानंतर अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत रेशीम शेतीचे महत्त्व पोहोचविण्यासाठी आणि रेशीम उत्पादनाची व्याप्ती वाढविण्यासाठी फिरत्या प्रयोगशाळेची संकल्पना पुढे आली. डॉ. शिर्के म्हणाले, 'फिरत्या प्रयोगशाळेची एक छोटी संकल्पना आम्ही पालकमंत्री पाटील यांच्यासमोर मांडली होती. मात्र, तिचे महत्त्व लक्षात घेऊन त्यांनी लक्ष घालून तिची पूर्तता केली आहे. रेशीमशास्त्रज्ञ डॉ. अधिकराव जाधव यांनी प्रयोगशाळेची माहिती दिली.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, जी. आर. पळसे, डॉ. आर. के. कामत, डॉ. एस. एस. महाजन, डॉ. संजय जाधव, डॉ. ए. ए. देशमुख, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. एम. एस. देशमुख उपस्थित होते. डॉ. माधुरी वाळवेकर यांनी सूत्रसंचालन केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या रेशीम शेती फिरत्या प्रयोगशाळेच्या लोकार्पण नामफलकाचे अनावरण करताना पालकमंत्री सतेज पाटील. शेजारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील.**

सकाळ

# नाइट कॉलेजमध्ये मोडी लिपी अभ्यासक्रम

कोल्हापूर, ता. १४ : मोडी लिपीचे प्रशिक्षण देण्यासाठी नाइट कॉलेजच्या मराठी विभागातर्फे १७ मेपासून एक महिन्याचा 'मोडी लिपी प्रमाणपत्र कोर्स' आयोजित केला आहे.

आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, शिवाजी विद्यापीठ मान्यताप्राप्त कोर्समध्ये मोडी लिपीचे वाचन व लेखनाचे संपूर्ण प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाईल. नाइट कॉलेजमध्ये सायंकाळी ६ ते ८ वेळेत कोर्स होणार आहे.

प्रवेशासाठी दहावी उत्तीर्ण असावे. इच्छुकांनी १५ मेपर्यंत मराठी विभागप्रमुख डॉ. अरुण शिंदे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रभारी प्राचार्य डॉ. एस. जे. फराकटे यांनी केले आहे.

सकाळ

# मुद्रितशोधन अभ्यासक्रम कोर्स

कोल्हापूर, ता. १४ : नाइट कॉलेजच्या मराठी विभागातर्फे एक महिन्याचा 'मुद्रितशोधन प्रमाणपत्र कोर्स' आयोजित केला आहे. आजीवन अध्ययन व विस्तार विभाग शिवाजी विद्यापीठ मान्यताप्राप्त कोर्समध्ये स्वरूप, लेखनविषयक नियम, व्याकरण, विरामचिन्हे, खुणा, प्रात्यक्षिक कार्य वगैरेंचे प्रशिक्षण तज्ज्ञ मार्गदर्शक देणार आहेत. नाइट कॉलेजमध्ये सायंकाळी ६ ते ८ वेळेत कोर्स होणार आहे. प्रवेशासाठी दहावी उत्तीर्ण असावे. १५ मेपर्यंत डॉ. अरुण शिंदे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रभारी प्राचार्य डॉ. एस. जे. फराकटे यांनी केले.

सकाळ

# 'तथागत गौतम बुद्ध' कादंबरीचे उद्या प्रकाशन

कोल्हापूर, ता. १४ : राजपुत्र सिद्धार्थ ते तथागत गौतम या दीर्घ मनोप्रवासाचं प्रत्ययकारी चित्रण करणाऱ्या एका महत्त्वाच्या कादंबरीचं प्रकाशन मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे होणार आहे. ज्येष्ठ लेखक वसंत गायकवाड लिखित 'तथागत गौतम बुद्ध' ही कादंबरी असून, सोमवारी (ता.१६) शाहू स्मारक भवनात सायंकाळी सातला प्रकाशन होईल. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असेल.

सकाळ

# 'वालचंद अभियांत्रिकी'चे मंगळवारी पदवीदान

## 'ऑगमेंटेड रिॲलिटी'चा वापर



डॉ. माशेलकर

सांगली, ता. १४ : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचा दहावा पदवीदान समारंभ येत्या मंगळवारी (ता. १७) होणार आहे. २०१९-२०२० आणि २०२०-२०२१ या दोन्ही शैक्षणिक वर्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा यावेळी गौरव करण्यात येईल. कोरोना महामारीमुळे मागील वर्षी हा समारंभ न झाल्याने या दोन्ही वर्षांतील उत्तीर्णांचा एकत्रित असा हा कार्यक्रम होत आहे. यावेळचा हा समारंभ ऑनलाईन स्वरूपातील 'ऑगमेंटेड रिॲलिटी' या तंत्राद्वारे होणार आहे.

या सोहळ्यात प्रमुख पाहुणे पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर आहेत. यावेळी सांगलीतून महाविद्यालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहातून प्रमुख ४८ यशवंतांचा सत्कार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के करतील. खासदार संजय पाटील, प्रशासकीय कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष अजित गुलाबचंद, महाविद्यालयाचे संचालक डॉ. पी. एच. सावंत यांचेही यावेळी मार्गदर्शन होणार आहे. एकूण १३५५ विद्यार्थी पदवी घेतील. त्यांच्यासह जगभरातील 'वॉलचंदियन्स' हा कार्यक्रम पाहतील. यानिमित्ताने महाविद्यालयातील परीक्षा विभागातील अत्याधुनिक सुविधांचे उद्‌घाटन कुलगुरूंच्या हस्ते होईल.

डॉ. प्रशांत खरात व प्रा. अनिल सुर्वे या संपूर्ण कार्यक्रमाचे समन्वयक आहेत. हा कार्यक्रमासाठीची लिंक महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर (www.walchandsangli.ac.in ) उपलब्ध असेल. यंदाचे वर्ष महाविद्यालयाचे अमृतमहोत्सवी म्हणून साजरे होत असून, त्यानिमित्ताने वर्षभर विविध उपक्रम होत आहेत.

15 MAY 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रेशीम उत्पादन वाढीसाठी नियोजनबद्ध प्रयत्न करु

- पालकमंत्री सतेज पाटील
- रेशीम शेती फिरत्या प्रयोगशाळेचा लोकार्पण सोहळा

कोल्हापूर

रेशीम उत्पादन व उद्योग क्षेत्रात जिल्ह्याला पुढे घेऊन जाण्यासाठी नजीकच्या काळात नियोजनबद्ध प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही पालकमंत्री सतेज पाटील यांनी दिली. शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभागाने जिल्हा नियोजन मंडळाच्या सहकार्यातून उभारलेल्या 'रेशीम शेती फिरत्या प्रयोगशाळे'चे लोकार्पण शुक्रवारी पालकमंत्री सतेज पाटील यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मश्री डॉ. जी. डी. यादव, जिल्हा नियोजन अधिकारी विजय पवार प्रमुख उपस्थित होते.

पालकमंत्री पाटील म्हणाले, शेतीच्या बांधापासून रेशीम निर्मितीपर्यंत असा एक अनोखा आणि महत्वपूर्ण उपक्रम शिवाजी विद्यापीठाने हाती घेतला. त्यासाठी शेतकऱ्यांची मानसिकता आणि प्रशिक्षण अशा दोन्ही अंगाने विकास करण्यासाठी खास शेतकऱ्यांसाठी पदविका अभ्यासक्रम आखून त्याअंतर्गत सातत्याने मार्गदर्शन केल्याचे सांगितले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, फिरत्या विद्यापीठाच्या राजर्षी शाहू हवामान बदल केंद्राच्या माध्यमातून जिल्ह्यातील पूरस्थितीच्या अनुषंगाने अंतरिम अहवाल तयार असून तो पुढील आठवड्यात सादर करण्यात येईल, असेही कुलगुरूंनी सांगितले. रेशीमशास्त्रज्ञ डॉ. अधिकराव जाधव यांनी प्रास्ताविक केले, तर डॉ. माधुरी वाळवेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. संजय जाधव, प्राणीशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. ए. ए. देशमुख आदी उपस्थित होते.

तरुण भारत

# विद्यापीठाच्या विधी विभागांतर्गत आयोजित कार्यशाळा उत्साहात

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या विधी अधिविभागामार्फत पाच दिवसीय कार्यशाळेचे जुडिशियल एक्झामिनेशन ॲण्ड फंडामेंटल ऑफ कोर्ट प्रॅक्टिस या विषयावर पाच दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश टीव्ही नलवडे यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन झाले.

या कार्यशाळेत ॲड. सूर्यकांत मिरजे, डॉ. राजेंद्र अनभुले, निवृत्त जिल्हा न्यायाधीश एस. पी. कुलकर्णी, प्रा. संजय आहेर, ॲड. विक्रम कुलकर्णी, ॲड. सचिन माने, सतीश पाटील, एस. टी. चौगुले आदींनी विधी विद्यार्थ्यांना वकिलांची कर्तव्य न्यायालयीन अधिकार यांचे स्वातंत्र्य विधी शिक्षणानंतरच्या संधी साक्षी पुरावा अधिनियम याबरोबरच न्यायाधीश पूर्वपरीक्षेसाठी कशाप्रकारे अभ्यास करावा अशा विविध विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विधी विभागातील विभागप्रमुख डॉ. व्ही. वाय. धुपदाळे, सूत्रसंचालन ॲड. आदिती वडेर, आभार माधवी माळगे, विक्रम इरळे यांनी केले. यावेळी प्रमोद दाभाडे, ओंकार कोळेकर, एच. डी. निकम-पाटील, हेमलता चाळके स्नेहल फडणीस, रसिका पाटील आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विधी विभागांतर्गत आयोजित पाच दिवसीय कार्यशाळेत मार्गदर्शन करतेवेळी मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश टि. व्ही. नलवडे.**